आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२८ सप्टेंबर २०२५ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पूरस्थिती कायम, प्रत्यक्ष फिल्डवर राहून काम करण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या अधिकार्यांना  सूचना

- आत्मनिर्भरतेचं उद्दिष्ट गाठण्याकरता सणासुदीला स्वदेशी वस्तूंची खरेदी करण्याचं प्रधानमंत्र्यांचं ‘मन की बात’मधून आवाहन

- भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या अध्यक्षपदी मिथुन मन्हास यांची निवड

- ज्येष्ठ साहित्यिक भास्कर चंदनशिव यांचं निधन

**आणि**

- आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी भारत आणि पाकिस्तान यांच्यात आज अंतिम लढत

<><><><><><>

राज्यात अनेक ठिकाणी आजही मुसळधार पाऊस होत असून अनेक ठिकाणी पूरस्थिती कायम आहे.

**छत्रपती संभाजीनगर शहरासह** मराठवाड्याच्या काही भागात मुसळधार होत असून कन्नड तालुक्यातल्या  शिवना नदीला पूर आला आहे.

**अहिल्या नगर** जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरू असून विविध प्रकल्पांमधून मोठा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे अनेक नद्यांना पूर आला आहे. शहराच्या जवळून वाहणाऱ्या सीना नदीला आलेल्या पुराचं पाणी थेट शहरात घुसल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. आपत्ती निवारण कक्षाच्या सहाय्यानं बचावकार्य सुरू असून होड्यांधून नागरिकांची सुटका करण्यात आली. शेवगाव तालुक्यात देवटाकळी इथं पुराच्या पाण्यात अडकलेल्या नागरिकांना हेलिकॉप्टरच्या मदतीनं बाहेर काढण्यात आलं.

**बीड शहरात** झालेल्या मुसळधार पावसामुळं काही भागात घरांमध्ये पाणी शिरलं. **लातूर** जिल्ह्यातल्या जळकोट तालुक्यात बेळसांगवी गावातल्या अनेक नागरिकांना स्थलांतरित करावं लागलं. **नांदेड**मधे विष्णुपुरी प्रकल्पात अद्याप पाण्याची आवक सुरु असून गोदावरी नदीप्रवाहानं धोक्याची पातळी ओलांडली आहे. जिल्ह्यात अतिवृष्टी आणि महापुरामुळे एक बळी गेला आहे. नांदेड शहराच्या अनेक भागात पुराचं पाणी शिरल्यानं ९७० नागरिकांना निवारा केंद्रात हलवलं आहे. ग्रामीण भागातही एक हजाराहून अधिक नागरिकांना स्थलांतरित केलं आहे.

**परभणी** जिल्हा आणि शहरात अतिवृष्टीची नोंद झाली असून पूर्णा तालुक्यातल्या कातनेश्वर इथं घरांची पडझड झाली. बुलढाणा जिल्ह्यातल्या खडकपूर्णा आणि येलदरी धरणातून पूर्णा नदीपात्रात पाण्याचा विसर्ग झाल्यानं नदीनं धोक्याची पातळी गाठली आहे. **हिंगोली** जिल्ह्यात कयाधू नदीला महापूर आला आहे. **येलदरी आणि इसापूर धरणातून पाण्याचा विसर्ग वाढला आहे.** कळमनुरी तालुक्यातल्या कोंढुर गावामध्ये पाणी शिरल्यानं जन जीवन विस्कळीत झालं आहे. **धाराशिव** जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे जिल्हा परिषदेच्या ७८ शाळांमधल्या १२५ वर्गखोल्यांची पडझड झाली.

**नाशिकमधे** गंगापूरसह अनेक धरणातून विसर्ग वाढवला आहे. **धुळे** जिल्ह्यात धुळे, शिंदखेडा, साक्री, शिरपूर या तालुक्यांमधे अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला आहे. यामुळे पांझरा, बोरी, अरुणावती नदीला पुन्हा एकदा पूर आला आहे. अक्कलपाडा धरणातून तसंच अनेर, मालनगाव आणि बुराई या मध्यम प्रकल्पातुन सुद्धा पांझरा नदीत पाणी सोडण्यात आलं आहे. पांझरा नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

**अकोला** जिल्ह्यासह अकोला शहरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील अनेक सखल भागांमध्ये गुडघाभर पाणी साचलं.

**जालना** जिल्ह्यात काल मध्यरात्री आणि आज झालेल्या मुसळधार पावसानं भोकरदन, जाफराबाद, घनसावंगी तालुक्यात पुराचं पाणी शेतशिवारात शिरून पिकं पाण्याखाली गेली. माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी आज भोकरदन तालुक्यात झालेल्या नुकसानीची पाहणी केली.

**मुंबई शहरासह उपनगरात** काही सखल भागात पाणी साचण्याची शक्यता असल्यानं अशा ठिकाणी पाणी उपसा करण्यासाठी पर्जन्य जलवाहिन्या विभागानं उपसा पंप २४ तास कार्यान्वित ठेवले आहेत. **ठाणे आणि पालघर** जिल्ह्यात जोरदार वाऱ्यासह, ढगांचा गडगडाट आणि विजांसह पाऊस पडत आहे. **पालघर जिल्ह्यात होत असलेली अतिवृष्टी पाहता उद्या पालघर जिल्ह्यातल्या सर्व शाळा महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.** उल्हास नदीनं पूररेषा ओलांडल्यानं ठाणे-कल्याण महामार्गावरची वाहतूक तात्पुरती वळवावी लागली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज सकाळी मराठवाड्यातल्या आठ जिल्ह्यांसह सोलापूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकार्यांशी संपर्क करुन पावसाच्या, मदतकार्याच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. त्यानंतर बातमीदारांशी बोलताना त्यांनी सांगितलं....

**- - होल्ड बाईट मुख्यमंत्री - -**

पावसामुळे धरणांमधून विसर्ग वाढवण्याआधीच नदीकाठच्या ग्रामस्थांना सुरक्षित स्थळी हलवण्याकडे लक्ष द्यावं, आणि सर्व अधिकार्यांनी प्रत्यक्ष फिल्डवर राहून काम करावं, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

**<><><><><><>**

येत्या २ दिवसात राज्यात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून कोकण आणि मध्यमहाराष्ट्रात आजकरता जोरदार पावसाचा रेड अलर्ट तर उद्याकरता ऑरेंज अलर्ट हवामान विभागानं दिला आहे. तुरळक ठिकाणी मेघगर्जना

आणि विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता आहे. मराठवाडा आणि विदर्भातही बऱ्याच ठिकाणी पावसाची  शक्यता आहे.

-<><><><><>

नांदेड जिल्ह्यातल्या धर्माबाद तालुक्यात रोशनगाव  इथल्या गावकऱ्यांनी आज गोदावरी पात्रात जलसमाधी घेण्याचा प्रयत्न केल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. बॅकवॉटरमुळे महिन्याभरापासून पिकं  पाण्याखाली गेली आहेत, त्यात हाताला काम नाही, म्हणून  या  गावकऱ्यांनी  हे आंदोलन केलं. धर्माबादच्या तहसीलदार आणि अधिकाऱ्यांनी याबाबत लवकरच उपायोजना केल्या जातील, असं आश्वासन दिलं आहे.

<><><><><>

आगामी सणासुदीचा काळ स्वदेशी गोष्टींचा वापर करून साजरा करण्याचा संकल्प करावा असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आज आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या एकशे सव्वीसाव्या भागात देशवासीयांशी संवाद साधला. आत्मनिर्भरतेचा मार्ग स्वदेशीतूनच पुढे जातो असं ते म्हणाले. जीएसटी सुधारणांमुळे बचत उत्सव साजरा होत असताना "व्होकल फॉर लोकल" हा खरेदीचा मंत्र बनला पाहिजे, असं त्यांनी सांगितलं.

सण उत्सवांच्या निमित्तानं करण्याची स्वच्छता घरापुरती मर्यादित नसून संपूर्ण परिसराची स्वच्छता देखील आपल्या सगळ्यांचीच जबाबदारी असल्याचं त्यांनी सांगितलं. आजच्या दिवशीच हुतात्मा भगतसिंग आणि महान गायिका लता मंगेशकर यांची जयंती असल्याचं स्मरण करून देत त्यांनी या दोघांनाही अभिवादन केलं, आणि त्यांच्या कार्याचा गौरव केला.

नवरात्रौत्सवाचं औचित्य साधून प्रधानमंत्र्यांनी देशाच्या महिला शक्तीच्या सामर्थ्याचा गौरव केला. ते म्हणाले…

…**होल्ड -  बाईट - प्रधानमंत्री MKB MAHILA SHAKIT - -**

नौदलाच्या दीर्घ सागरी सफरीत सहभागी झालेल्या लेफ्टनंट कमांडर दिलना आणि लेफ्टनंट कमांडर रुपा यांच्याशी संवाद साधून, त्यांच्या आव्हानात्मक सफरीचे अनुभव ऐकण्याची संधी त्यांनी श्रोत्यांना दिली.

येत्या २ ऑक्टोबरला महात्मा गांधी यांची जयंती साजरी करताना खादीचं कोणतंही उत्पादन खरेदी करून, अभिमानानं ते व्होकल फॉर लोकल या हॅशटॅगसोबत समाजमाध्यमांवर सामायिक करावं असं आवाहन त्यांनी केलं.

यंदाच्या विजयादशमीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला १०० वर्ष पूर्ण होत असल्याचा उल्लेख करुन त्यांनी संघाच्या स्थापनेपासूनच्या वाटचालीचा गौरव केला.

लोकप्रिय आसामी गायक जुबीन गर्ग आणि प्रसिद्ध कन्नड साहित्यिक एस.एल. भैरप्पा यांचं स्मरण करत प्रधानमंत्र्यांनी त्यांना आदरांजलीही वाहिली.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा करपुनर्रचनेमुळे प्रक्रीयाकृत अन्नपदार्थांवर झालेल्या परिणामाबद्दलची माहिती आज ऐकूया......

**होल्ड- व्हॉईस कास्ट**

*(मखाण्यापासून तयार होणाऱ्या खाद्यपदार्थांवरचा कर १२ टक्क्यांवरुन ५ टक्के करण्यात आला आहे. याशिवाय फळांचे रस, मुरांबे आणि लोणच्यांवरचा तसंच फरसाण आणि सॉसेस वरचा करही १२ टक्क्यांवरुन ५ टक्क्यांवर आला आहे. बिस्किटांवरचा कर १८ टक्क्यांवरुन ५ टक्के झाला आहे. यामुळे हे खाद्यपदार्थ अधिक परवडण्याजोगे झाले असून ग्राहक आणि उत्पादक दोघांनाही फायदा होईल.)*

**<><><><><>**

बीसीसीआय अर्थात भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या अध्यक्षपदी मिथून मन्हास यांची निवड झाली आहे. केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी त्यांच्या नावाची

घोषणा केली. मिथून हे प्रथम श्रेणी क्रिकेटचे खेळाडू असून आयपीएलसाठी खेळणारे ते जम्मू काश्मीरमधले पहिले खेळाडू आहेत. बीसीसीआयच्या अध्यक्षपदासाठी मनहास यांचा एकच अर्ज आल्यामुळे त्यांची बिनविरोध निवड झाली आहे. रॉजर बिनी यांनी राजीनामा दिल्यामुळे हे पद रिक्त झालं होतं.

**<><><><><>**

ज्येष्ठ साहित्यिक भास्कर चंदनशिव यांचं लातूर इथं निधन झालं. ते ८० वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर उपचार सुरू होते. आज सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. चंदनशिव यांच्या पार्थिव देहावर आज संध्याकाळी कळंब या त्यांच्या मूळगावी अंत्यसंस्कार करण्यात आले.

चंदनशिव हे धाराशिव जिल्ह्यात कळंब तालुक्यातल्या हासेगावचे मूळ रहिवासी होते. ग्रामीण साहित्यात वेगळी कथा लिहून त्यांनी ग्रामीण समाजातली स्थित्यंतरं चित्रित केली. जांभळढव्ह, अंगार माती, नवी वारूळ, बिरडं, मरणकळा हे त्यांचे कथासंग्रह, भूमी आणि भूमिका हा समीक्षा ग्रंथ तर रानसय हा ललित संग्रह गाजला होता. त्यांच्या साहित्याला राज्य शासनाच्या पुरस्कारासह अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

चंदनशिव यांनी २८व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचं, तसंच राष्ट्रीय शेतकरी साहित्य संमेलनाचं अध्यक्षस्थानही भूषवलं होतं.

**<><><><><>**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना आज भारत आणि पाकिस्तान यांच्यात होणार आहे. काही वेळात, म्हणजे ८ वाजता हा सामना सुरू होईल.

या स्पर्धेच्या ४१ वर्षांच्या इतिहासात प्रथमच भारत आणि पाकिस्तान यांच्यात अंतिम सामना होत आहे. आतापर्यंत या दोन संघांमधे टी-ट्वेंटी चे १५ सामने झाले असून त्यात १२ वेळा भारतीय संघ विजयी ठरला आहे.

**<><><><><>**

आयएसएसएफ कनिष्ठ गट जागतिक नेमबाजी स्पर्धेत भारताच्या अनुष्का ठोकूरने आज मुलींच्या ५० मीटर रायफल थ्री पोझीशन प्रकारात सुवर्णपदक मिळवलं. नवी दिल्लीत सुरु असलेल्या या स्पर्धेतलं हे तिचं दुसरं सुवर्णपदक आहे. मुलांच्या स्पर्धेत एड्रियन कर्माकारला रौप्य पदक मिळालं. स्पर्धेत आतापर्यंत ४ सुवर्ण, ६ रौप्य आणि ३ कांस्य पदकं मिळवून भारत पदकतालिकेत अग्रस्थानी आहे.

**<><><><><><>**

सेवा पर्व या मालिकेत आज आपण प्रधानमंत्री पीएम किसान सन्मान निधी योजनेविषयी जाणून घेणार आहोत....

**व्हीसी**

*देशाचा अन्नदाता असणाऱ्या शेतकऱ्याला अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. याचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी केंद्र सरकारने २०१८ ला प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेची घोषणा केली. याची सुरवात २४ फेब्रुवारी २०१९ पासून झाली. तेव्हा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले होते....*

***होल्ड बाईट मोदी***

*प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना देशातल्या सर्वात मोठ्या कल्याणकारी योजनांपैकी एक आहे. या योजने अंतर्गत शेतकऱ्यांना दर चार महिन्यांनी दोन हजार रुपये दिले जातात. ही रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात वर्ग केली जाते. असे वर्षभरात सहा हजार रुपये शेतकऱ्याच्या खात्यात जमा होतात. या योजने अंतर्गत आतापर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यामधे तीन लाख ९० हजार कोटी रुपये जमा झाले असून शेतकऱ्यांच्या जगण्यात सकारात्मक बदल झाला आहे.*

**<><><><><><>**

शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक प्रगतीतूनच चर्मकार समाजाचा विकास होऊ शकतो, त्यामुळे चर्मकार समाजानं मुलांच्या शिक्षणावर भर द्यावा, असं

आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं आहे. ते आज नागपूर इथं चर्मकार सेवा संघाच्या वतीनं आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात बोलत होते. चर्मकार समाजाला उद्योग, व्यवसायात पुढं यावं लागेल. समाजातले काही लोक उद्योजक झाले तर सर्व समाजाचा विकास होईल, असं ते म्हणाले.

<><><><><>

चंद्रपूर जिल्हा खनिज प्रतिष्ठाननं तयार केलेल्या कॉफी टेबल बुकचं अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते आज झालं. चंद्रपूर जिल्ह्यात खनिज विकास निधीतून अनेक मोठे उपक्रम राबवले जात असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. चंद्रपूर आणि गडचिरोली इथं औद्योगिक विकास वेगानं होत असून यातून समृद्ध अर्थव्यवस्था निर्माण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

<><><><><>

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि. द. फडणीस यांच्या नावानं व्यंगचित्र अध्यासन सुरू केलं जाईल अशी घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांनी केली. ते आज पुण्यात शि. द. फडणीस यांच्या निवासस्थानी त्यांची भेट घेतल्यानंतर बोलत होते.

<><><><><>

छत्तीसगडमध्ये कांकेर जिल्ह्यात तिरियारपाणीच्या जंगलात आज सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत तीन माओवादी ठार झाले. त्यांच्यावर एकूण १४ लाख रुपयांचं बक्षीस होतं. घटनास्थळावरून बंदुका आणि इतर साहित्य जप्त करण्यात आलं आहे. या भागात सात ते आठ माओवादी लपून बसल्याची माहिती जिल्हा राखीव पोलिसांना मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे शोधमोहीम राबवल्यानंतर माओवाद्यांनी सुरक्षा दलांवर गोळीबार केल्यानं ही चकमक सुरू झाली. ठार झालेल्या माओवाद्यांमध्ये श्रवण मडकम उर्फ विश्वनाथ याचा समावेश असून त्याच्यावर ८ लाख रुपयांचं बक्षीस होतं.

<><><><><><>

अकरा वर्षांआधी जम्मू काश्मीरमधली फुटीरतावादी चळवळ, नक्षलवादी चळवळ आणि ईशान्य भारतातील फुटीरतावादी चळवळ हे तीन अंतर्गत धोके सर्वात मोठे होते. मात्र रालोआ सरकार स्थापन झाल्यानंतर तिन्ही ठिकाणच्या फुटीरतावादी चळवळी मोडून पडल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं श्यामाप्रसाद मुखर्जी भारत मंथन २०२५ या कार्यक्रमात बोलत होते. आज ईशान्य भारतात मोठं परिवर्तन झालं असून हा भाग भारताच्या मुख्य भूमीच्या अधिक जवळ आला आहे, नक्षलवादी चळवळ पुढच्या वर्षीपर्यंत संपुष्टात येईल असं शहा म्हणाले. जम्मू काश्मीरमधे २७० कलम रद्द करून तिथं शांतता स्थापित करण्यात यश आल्याचं शहा यांनी नमूद केलं.

पशुपती ते तिरुपती हे क्षेत्र रेड कॉरीडॉर म्हणून ओळखलं जात असे. देशातला १७ टक्के भाग नक्षलग्रस्त होता. जम्मू काश्मीर आणि ईशान्य भारत मिळून ४ टक्के भाग फुटीरतावाद्यांच्या अंमलाखाली होता. हा सर्व भाग मुक्त करण्यात केंद्र सरकारला यश आल्याचं शहा म्हणाले.

//<><><><><><>//